नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये
यवतमाळ व धुळे

---

नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात
सन १९८९-९० या शैक्षणिक वर्षामध्ये
उघडण्याबाबत

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग
शासन निर्णय क्र. एमईडी १६८८/४४७६/सीआर-४७९/एमईडी-४(अ)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक १२ मे, १९८९.

<u>शासन निर्णय</u> :- महाराष्ट्रात वैद्यकीय शिक्षणाची सोय अपुरी आहे, असे आढळून आल्याने शासनाने काही नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये उघडण्याचे ठरविले. त्यानुसार छाननी केली असता असे आढळून आले की, अमरावती व नाशिक या महसूल विभागामध्ये सध्या एकही शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नाही. या दोन्ही महसूल विभागाच्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी काही वेगळी सोय करण्याची आवश्यकता होती व त्याच दृष्टीने अमरावती व नासिक महसूल विभागात नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उघडण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता.

२ धुळे जिल्हा आदिवासी असल्याने व यवतमाळ जिल्ह्यात मजुरांची संख्या जास्त असल्याने व दोन्ही जिल्ह्यात वैद्यकीय सुविधांचा दर्जा वाढविण्याची आवश्यकता असल्याने व विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी म्हणून शासनाने असा निर्णय घेतला आहे की, यवतमाळ व धुळे येथे प्रत्येकी ५० विद्यार्थ्यांना प्रथम एम.बी.बी.एस. या वर्गात प्रवेश मिळेल अशाप्रकारे शासकीय वैद्यकीय महाविद्यालये उघडण्यात यावीत. काही कालाने ही प्रवेश क्षमता १०० पर्यंत वाढविण्यात येईल. या वैद्यकीय महाविद्यालयामध्ये जून १९८९ पासून नियमित प्रवेश देण्यात येईल. कर्मचारीवृंद व इतर साधनसामुग्री खरेदी करण्याबाबतचे आदेश नंतर निर्गमित करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-
(म.प्र.टाकसाळे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये
सर्व मंत्रालयातील विभाग
महालेखापाल-१ व २, महाराष्ट्र राज्य, मुंबई व नागपूर
कोषागार अधिकारी, यवतमाळ/धुळे
महासंचालक माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई